| | | | |
|---|---|---|---|
| **MHND190015522022** | प्राप्त दिनांक | : | ०४/११/२०२२ |
| | नोंदणी दिनांक | : | ०४/११/२०२२ |
| | निकाल दिनांक | : | ०८/०५/२०२५ |
| | कालावधी | : | ०२ व. ०६ म. ०४ दि. |

## भाग–'अ'
## Form No. XXXII
## (Title Page of the Judgment)
## (Para 44(i) of Chapter VI of Criminal Manual)

## न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, लोहा, ता. लोहा, जि. नांदेड
## यांचे न्यायालयात
## (पिठासीन अधिकारी– श्री. संतोष एल.वैद्य)

| | |
|---|---|
| **नियमीत फौजदारी खटला क्र. १९६/२०२२** | **गु.र.क्र. ८३/२०२२** |
| **CNR: MHND190015522022** | **निशाणी – ६०/ब** |

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | | **महाराष्ट्र शासन तर्फे,**<br>**सोनखेड,** पोलीस स्टेशन,<br>ता. लोहा, जि. नांदेड. |
| उपस्थिती | | सरकार तर्फे सहा. सरकारी अभियोक्ता **श्री. के. एम. गिरी** |
| आरोपी | १. | **राजेश व्यंकटराव काळे,**<br>वयः– ४५ वर्षे, व्यवसायः– शेती, |
| | २. | **उज्वला राजेश काळे ,**<br>वयः– ३९ वर्षे, व्यवसायः– घरकाम, |
| | ३. | **विठ्ठल व्यंकटराव काळे ,**<br>वयः– ४१ वर्षे, व्यवसायः– शेती, |
| | ४. | **सुरेखा विठ्ठल काळे ,**<br>वयः– ३० वर्षे, व्यवसायः– घरकाम,<br>सर्व रा. वडगाव, ता. लोहा, जि. नांदेड. |
| उपस्थिती | | आरोपींतर्फे विधीज्ञ **श्री. जे. वाय. पठाण** |

| | |
|---|---|
| **दोषारोप–** | भारतीय दंड संहिता १८६० कलम ३२४, ३२३, ५०४ व ५०६ सह कलम ३४ अन्वये. |

**भाग–'ब'**
**(Para 44(ii) of Chapter VI of Criminal Manual)**

| | | |
|---|---|---|
| (१) | घटना घडल्याचा दिनांक | १६/०५/२०२२ |
| (२) | प्रथम खबर अहवाल दिनांक | २२/०५/२०२२ |
| (३) | दोषारोपपत्र दाखल झाल्याचा दिनांक | ०४/११/२०२२ |
| (४) | दोषारोप निश्चीती दिनांक | २४/०८/२०२३ |
| (५) | पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | २६/१०/२०२३ |
| (६) | न्यायनिर्णयासाठी राखुन ठेवलेली दिनांक | ०८/०५/२०२५ |
| (७) | न्यायनिर्णयाचा दिनांक | **०८/०५/२०२५** |
| (८) | शिक्षेची तारीख, जर असेल तर | नाही |

## आरोपींचा तपशील

| अ. क्र. | आरोपींचे नाव | अटक दिनांक | जमीनावर आरोपीस मुक्त केल्याचा दिनांक | गुन्ह्याचे कलम | निर्दोष किंवा दोषी | शिक्षा सुनावली | फौ.प्र. सं. कलम ४२८ अन्वये किती दिवस तुरुंगा मध्ये राहिले होते. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | **राजेश व्यंकटराव काळे** | फौ.प्र.सं. चे कलम ४१ (१) (अ) प्रमाणे नोटीस | दिनांक २४.०७.२०२३ | भा. दं. सं. चे कलम ३२४, ३२३, ५०४ व ५०६ सह कलम ३४ अन्वये. | **निर्दोष मुक्त केले.** | नाही. | निरंक |
| २. | **उज्वला राजेश काळे** | फौ.प्र.सं. चे कलम ४१ (१) (अ) प्रमाणे नोटीस | दिनांक २४.०७.२०२३ | भा. दं. सं. चे कलम ३२४, ३२३, ५०४ व ५०६ सह कलम ३४ अन्वये. | **निर्दोष मुक्त केले.** | नाही. | निरंक |
| ३. | **विठ्ठल व्यंकटराव काळे** | फौ.प्र.सं. चे कलम ४१ | दिनांक २४.०७.२०२३ | भा. दं. सं. चे कलम ३२४, ३२३, | **निर्दोष मुक्त केले.** | नाही. | निरंक |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | (१) (अ) प्रमाणे नोटीस | | ५०४ व ५०६ सह कलम ३४ अन्वये. | | | |
| ४. | **सुरेखा विठ्ठल काळे** | फौ.प्र.सं. चे कलम ४१ (१) (अ) प्रमाणे नोटीस | दिनांक २४.०७.२०२३ | भा. दं. सं. चे कलम ३२४, ३२३, ५०४ व ५०६ सह कलम ३४ अन्वये. | **निर्दोष मुक्त केले.** | नाही. | निरंक |

## भाग–'क'

## (Para 44(iii) of Chapter VI of Criminal Manual)
## सरकारी साक्षीदार/ बचावपक्षाचे साक्षीदार/न्यायालयाचे साक्षीदार यांची यादी

### अ– सरकारी साक्षीदारांची यादी

| अ. क्र. | साक्षीदारांची नावे | निशाणी | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|---|
| सा. क्र. ०१ | दिपक पि. नारायण जाधव | ३० | जप्ती पंच |
| सा. क्र. ०२ | संजय पि. व्यंकटराव काळे | ३५ | फिर्यादी |
| सा. क्र. ०३ | छाया संजय काळे | ३८ | साक्षीदार |
| सा. क्र. ०४ | डॉ. मोहमंद अली | ४० | वैद्यकीय अधिकारी |
| सा. क्र. ०५ | वामन माधवराव नागरगोजे | ५२ | तपास अधिकारी |

### ब– बचावपक्ष साक्षीदार

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

### क– न्यायालय साक्षीदार

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

### सरकारी साक्षीदार/ बचावपक्षाचे साक्षीदार/न्यायालयाचे साक्षीदार यांची निशानी

## अ–सरकारी

| अ.क्र. | वर्णन | निशानी क्रमांक |
|---|---|---|
| १. | फिर्याद | ३६ |
| २. | एफ.आय.आर. | ३७ |
| ३. | वैद्यकीय प्रमाणपत्र | ४१ |
| ४. | घटनास्थळ पंचनामा | ५३ |
| ५. | जप्ती पंचनामा | ५४ |

## ब–बचावपक्ष

| अ.क्र. | निशानी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

## क–न्यायालय

| अ.क्र. | निशानी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

## ड–जप्त मुद्देमाल

| अ.क्र. | निशानी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | अर्टीकल– अ | कोयता |

## न्या य नि र्ण य
## (घोषित दिनांक ०८ मे, २०२५ रोजी)

आरोपींविरुध्द भारतीय दंड संहिता, १८६० (भा.दं.सं.) कलम ३२४, ३२३, ५०४ व ५०६ सह ३४ अन्वये दंडनीय अपराधाचा दोषारोप ठेवून सदरचा चालविण्यात आला.

## अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत

२. फिर्यादी हा वडगाव, ता. लोहा, जि. नांदेड येथील रहिवासी असुन शेती व्यवसाय करतो. आरोपी क्र. ०१ व ०३ हे फिर्यादीचे सख्खे भाऊ असुन आरोपी क्र. ०२ ही आरोपी क्र. ०१ ची पत्नी आहे व आरोपी क्र. ०४ ही आरोपी क्र. ०३ ची पत्नी आहे. दिनांक १६.०५.२०२२ रोजी दुपारी ०२.३० वाजेच्या सुमारास फिर्यादी त्याच्या घरात असतांना आरोपी क्र. ०१ राजेश काळे हा फिर्यादी व आरोपी यांच्या सामाईक भिंतीला छिद्र पाडत होते. सामाईक भिंत असुन आपला न्यायालयात वाद चालू आहे, भिंतीला छिद्र पाडु नये असे फिर्यादीने आरोपी क्र. ०१ ला सांगितले असता आरोपी क्र. ०१ हा फिर्यादीस शिवीगाळ करुन तुला आता खतम करतो, असे म्हणुन सर्व आरोपींनी फिर्यादीस मारहाण करण्यास सुरुवात केली. आरोपी क्र. ०१ राजेश काळे यांनी हात कोयता घेऊन फिर्यादीच्या उजव्या डोळयाच्या बाजुला कोयत्याने मारुन दुखापत केली. तसेच सर्व आरोपींनी फिर्यादीस लाथा बुक्क्यांनी गालावर व पाठीवर मारहाण केली. त्यावेळी फिर्यादीची पत्नी सोडवण्यास आली असता तिला ही आरोपींनी धक्का बुक्की करुन शिवीगाळ केली. त्यानंतर फिर्यादीने दवाखान्यात जाऊन उपचार घेतले. उपचार घेतल्यानंतर पोलिस ठाण्यात जाऊन आरोपींविरुध्द फिर्याद दिली.

## <u>अन्वेशन व दोषारोप</u>

३. फिर्यादीने दिलेल्या फिर्यादवरुन आरोपींविरुध्द पोलीस ठाणे सोनखेड येथे दि. २२.०५.२०२२ रोजी भारतीय दंड संहिता कलम ३२४, ३२३, ५०४ व ५०६ सह कलम ३४ अन्वये गुन्हा रजिस्ट्रर क्र. ८३/२०२२ हा गुन्हा नोंदवण्यात आला. सदर गुन्ह्याचा तपास पोलीस कॉन्सटेबल श्री. डब्ल्यु. एम. नागरगोजे यांच्याकडे देण्यात आला. तपासादरम्यान तपासी आधिकारी यांनी घटनास्थळ पंचनामा तयार केला. आरोपी क्र. ०१ याच्या ताब्यातुन गुन्हयात वापरलेला कोयता जप्त केला. साक्षीदारांचे जबाब नोंदवले. फिर्यादीचे वैद्यकीय प्रमाणपत्र प्राप्त केले.

तपास पुर्ण करुन फौजदारी प्रक्रीया संहिता, १९७३ चे कलम १७३(२) (फौ.प्र.सं.) अन्वये या न्यायालयात आरोपींविरुध्द दोषरोपपत्र सादर केले.

## <u>खटला व साक्षीपुरावा</u>

४. आरोपी प्रस्तुत प्रकरणात हजर झाल्यानंतर फौ.प्र.सं. चे कलम २४० नुसार आरोपींविरुध्द निशाणी क्र. २१ अन्वये भा.दं.सं. ३२४, ३२३, ५०४ व ५०६ सह कलम ३४ या अपराधाकरीता दोषारोप निश्चीत करुन सदर दोषारोप आरोपींना वाचून दाखवण्यात आले. आरोपींनी त्यांचे निवेदन निशाणी क्र. २२ ते २५ अन्वये गुन्हा मान्य न करता संपरिक्षा करण्याची मागणी केली. त्यानंतर फौ.प्र.सं.चे कलम २४२ नुसार अभियोग पक्षातर्फे साक्षीदार तपासण्यात आले. फौ.प्र.सं.चे कलम ३१३ (१) (ख) प्रमाणे आरोपींना त्यांच्या विरुध्द दिसणा-या परिस्थितिविशेषांचा खुलासा करणे शक्य व्हावे, यासाठी सर्वसाधारण प्रश्न विचारण्याची गरज होती. सदर साक्षीदारांच्या पुराव्यामध्ये त्यांनी आरोपींविरूध्द कथन केले. त्यामुळे आरोपींच्या विरुध्द दिसणा-या परिस्थितिविशेषांच्या बाबत सर्वसाधारण प्रश्न विचारण्यात आले. फौ.प्र.सं.चे कलम २४३ प्रमाणे आरोपींनी त्यांच्या बचावात साक्षीपुरावा दिला नाही. आरोपींचा बचाव असा आहे की, त्यांना प्रस्तुत प्रकरणात खोटे गोवले. तसेच बचाव पक्षातर्फे साक्षीदारांचे घेतलेल्या उलट तपासावरुन व आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहीता कलम ३१३ अन्वये नोंदविलेल्या जबाबावरुन आरोपींचा असा ही बचाव असल्याचे दिसुन येते की, सामाईक घराच्या व जमीनीच्या वादामधुन आरोपींना प्रस्तुत गुन्ह्यात खोटे गोवण्यात आलेले आहे.

## <u>वादप्रश्न व निष्कर्ष</u>

५. अभियोग पक्षाची हकीकत, न्यायालयासमक्ष आलेला साक्षीपुरावा व दोन्ही पक्षांचा सखोल युक्तीवाद ऐकल्यानंतर खालीलप्रमाणे निर्णयीत करावयाचे

वादप्रश्न उपस्थित होतात. त्यावरील निष्कर्ष कारणमीमांसेसह यापुढे नोंदविण्यात येत आहेत.

| अ.क्र | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक १६/०५/२०२२ रोजी दुपारी ०२.३० वाजताचे सुमारास मौजे वडगाव, ता. लोहा, जिल्हा नांदेड, फिर्यादीच्या घराजवळ आरोपींनी संगणमत करुन फिर्यादीस कोयता या हत्याराने जे की, ज्या हत्याराने मारले असता मृत्यू होवु शकतो अशा घातक हत्याराने मारून ईच्छापुर्वक दुखापत केली आणि त्याद्वारे **भा.दं.सं. कलम ३२४ सह कलम ३४** अन्वये गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय ? | **....नाही** |
| २. | वरील दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी फिर्यादी व त्याच्या पत्नीला लाथा बुक्यांनी मारहाण करुन ईच्छापुर्वक दुखापत केली आणि त्याद्वारे **भा.दं.सं. कलम ३२३ सह कलम ३४** अन्वये गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय ? | **.... नाही** |
| ३. | वरील दिवशी, वेळी व ठिकाणी संगणमत करून आरोपींनी फिर्यादी व त्याच्या पत्नीला शिवीगाळ करुन अपमानित केले की ज्यामुळे त्याच्याकडून सार्वजनिक शांततेचा भंग होवू शकतो व त्याद्वारे **भा.दं.सं. कलम ५०४ सह ३४** अन्वये गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय ? | **....नाही** |
| ४. | वरील दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगणमत करुन उद्देशपुर्वक फिर्यादी व त्याच्या पत्नीला जिवे मारण्याची धमकी देवून धाकदपटशा केला व त्याद्वारे **भा.दं.सं. कलम ५०६ सह कलम ३४** अन्वये गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय ? | **....नाही** |
| ५. | काय आदेश ? | **..अंतीम आदेशाप्रमाणे** |

## कारणमीमांसा

६. आरोपींच्या विरोधात असलेला गुन्हा शाबीत करण्यासाठी अभियोग पक्षाने ०५ साक्षीदार तपासले. सरकारी वकिलांनी युक्तीवाद केला की, सदरच्या साक्षीदारांच्या पुराव्यानुसार आरोपींच्या विरोधात असलेला गुन्हा हा निःसंशयरित्या शाबीत झाला. पुढे असा युक्तीवाद करण्यात आला की, फिर्यादी व प्रत्यक्षदर्शी साक्षीदार यांनी त्यांच्या पुराव्यात आरोपी क्र. ०१ ने फिर्यादीस कोयत्याने उजव्या डोळ्याच्या बाजुला मारुन दुखापत केल्याचे स्पष्टपणे सांगितले आहे. तसेच सदर साक्षीदारांनी पुढे स्पष्टपणे असे देखील सांगितले आहे की, सर्व आरोपींनी फिर्यादी व त्याच्या पत्नीला लाथा बुक्क्यांनी मारहाण करुन दुखापत केली. सदर साक्षीदारांच्या उलट तपासामध्ये त्यांच्या पुराव्यावर विश्वास न ठेवण्यासारखे काहीही आले नाही. अभियोग पक्षातर्फे पंच साक्षीदार व तपास आधिकारी यांच्या पुराव्यातुन घटनास्थळ पंचनामा व जप्ती पंचनामा सिध्द केलेले आहेत. फिर्यादीस झालेली दुखापत वैद्यकीय अधिकारी यांच्या पुराव्यातुन सिध्द झालेली आहे. त्यामुळे आरोपींनी फिर्यादीस कोयता या हत्याराने मारुन तसेच सर्व आरोपींनी फिर्यादी व त्याच्या पत्नीला लाथा बुक्यांनी मारुन ईच्छापुर्वक दुखापत केल्याचे अभियोग पक्षाने संशयाच्या पलीकडे जावुन सिध्द केलेले आहे. त्यामुळे आरोपी हे शिक्षेस पात्र आहेत.

७. याउलट बचाव पक्षातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, फिर्यादीचा पुरावा हा महत्वाच्या घटनेबाबत अभियोग पक्षाच्या कथनाशी विसंगत असा आहे. वैद्यकीय आधिकारी यांचा पुरावा फिर्यादीच्या पुराव्याशी पुरक असा नाही. फिर्यादीच्या कथना प्रमाणे त्याला आरोपी क्र. ०१ ने कोयत्याने मारुन दुखापत केली. याउलट त्याच्या पत्नीचे असे कथन आहे की, आरोपी क्र. ०१ व ०३ यांनी फिर्यादीला कोयत्याने मारुन दुखापत केली. त्यामुळे सदर दोन्ही साक्षीदारांच्या पुराव्यात महत्त्वाच्या घटनेबाबत तफावत आहे. अभियोग पक्षातर्फे ईतर कोणतेही प्रत्यक्षदर्शी साक्षीदार तपासण्यात आलेले नाहीत. घटनास्थळ पंचनामा व जप्ती पंचानामा सिध्द झालेले नाहीत. त्यामुळे अभिलेखावरील पुराव्यातुन आरोपींविरुध्दचा

गुन्हा संशयाच्या पलीकडे जावुन सिध्द होत नाही. त्यामुळे आरोपींची संशयाच्या आधारे निर्दोष मुक्तता करण्यात यावी अशी बचाव पक्षातर्फे विनंती करण्यात आली आहे.

## वादप्रश्न क्र. ०१ ते ४ करिता

८. अभियोग पक्षाचे असे कथन आहे की, आरोपींनी फिर्यादीस कोयत्याने व लाथा बुक्यांनी मारुन ईच्छापुर्वक दुखापत केली. आरोपी क्र. १ ने फिर्यादीच्या उजव्या डोळ्याजवळ कोयत्याने मारुन दुखापत केली. तसेच सर्व आरोपींनी फिर्यादी व त्याच्या पत्नीला लाथा बुक्क्यांनी मारुन दुखापत केली. भा.दं.सं. कलम ३२४ अन्वये गुन्हा सिध्द होण्यासाठी आरोपींनी फिर्यादीस कोयता या घातक हत्याराने मारुन ईच्छापुर्वक दुखापत केली हे सिध्द होणे आवश्यक आहे. तसेच भा.दं.सं. कलम ३२३ अन्वये गुन्हा सिध्द होण्यासाठी आरोपींनी फिर्यादी व त्याच्या पत्नीला लाथा बुक्क्यांनी मारुन इच्छापुर्वक दुखापत केली हे सिध्द होणे आवश्यक आहे.

९. अभियोग पक्षातर्फे फिर्यादी संजय काळे (सा.क्र.२) यास तपासण्यात आले आहे. त्याचे असे कथन आहे की, घटना दिनांक १६/०५/२०२२ रोजी दुपारी ०२.३० वाजेच्या सुमारास मौ. वडगाव येथील त्याच्या घरासमोर घडली होती. आरोपी क्र. ०१ राजेश काळे हा त्याचा लहान भाऊ असुन त्याच्या घराशेजारी राहतो. आरोपी क्र. ०१ राजेश काळे हा सामाईक भिंतीला छिद्र पाडत होता. त्यावेळी त्याने सामाईक भिंत असुन न्यायालयात वाद चालु आहे, असे आरोपी क्र. ०१ यास म्हणताच आरोपी क्र. ०१ ने त्याला शिवीगाळ करायला सुरुवात केली. तसेच तुला खतम करतो, असे म्हणुन सर्व आरोपींनी त्याला मारायला सुरुवात केली. आरोपी क्र. ०१ ने त्याच्या उजव्या डोळ्याच्या बाजुला कोयता मारुन दुखापत केली. तसेच सर्व आरोपींनी त्याला थापडांनी व लाथा बुक्क्यांनी पाठीवर व गालावर मारहाण केली. त्याची पत्नी तेथे आली असता तिला ही सर्व आरोपींनी शिवीगाळ करुन धक्का बुक्की

केली. त्यानंतर तो सोनखेड पोलिस ठाण्यात गेला. पोलिसांनी त्याला उपचारासाठी मौ. सोनखेड येथील सरकारी दवाखान्यात पाठविले. तेथुन त्याला उपचारासाठी नांदेड येथील सरकारी दवाखान्यात पाठविले. उपचार घेऊन तो घरी आला. त्यावेळी त्याची मानसिक स्थिती बरोबर नव्हती. त्यामुळे दिनांक २२.०५.२०२२ रोजी त्याने पो.ठा. जाऊन फिर्याद दिली. त्याने फिर्याद (नि.क्र.३६) वरील त्याची सही ओळखून त्यातील मजकुर बरोबर असल्याचे सांगितले. तसेच आर्टीकल – अ कडील जप्त कोयता ओळखला.

**१०.** फिर्यादीने त्याच्या उलटतपासामध्ये त्याचे आरोपींसोबत असलेले नातेसंबंध मान्य करुन त्यांचे वडीलोपार्जीत शेती व घर असल्याचे मान्य केले. तसेच जो तो आपआपली शेती वहिती करत असल्याचे कबुल केले आहे. शेतीची वाटणी झाली असुन घर मिळकतीची वाटणी झाली नाही, असे त्याचे म्हणणे असल्याचे कबुल केले आहे. पुढे असे कबुल केले आहे की, घटनेच्या दिवशी आरोपी क्र. ०३ हा घराला दरवाजा बसविण्याचा प्रयत्न करत होता व त्याने विरोध केला होता. घटनेच्या दिवशी त्यांनी सर्वांनी मिळुन आरोपी क्र. ०३ ला कु–हाडीने मारहाण केली अशी आरोपी क्र. ०१ ने त्यांच्याविरुध्द केस दाखल केली असल्याचे देखील त्याने कबुल केले आहे. आरोपी क्र. ०३ ने कु–हाडीने मारहाण केल्याचे त्याने नाकारले आहे. तसेच आरोपींनी त्यांच्या विरुध्द तक्रार दिल्याचे माहिती त्याला झाली होती, असे देखील कबुल केले आहे. आरोपींनी तक्रार दिल्यामुळे त्यांनी पोलिस ठाण्यात जाऊन आरोपींविरुध्द खोटी केस केल्याचे त्यांनी नाकारले आहे. परंतु, घटनेच्या दिवशी त्यांनी कोणीही पोलिस ठाण्यात जाऊन फिर्याद दिली नसल्याचे कबुल केले आहे. पुढे असे कबुल केले आहे की, त्याच्या घराच्या आजुबाजूला बाबू डेमेवाड व दिगांबर काळे यांची घरे आहेत. घटनेच्या वेळी गावातील लोकं जमा झाले होते किंवा नाही, हे त्याला आठवत नसल्याचे त्याने कथन केले आहे. तसेच आरोपी क्र. ०१ व ०३ यांच्या विरुध्द त्याने न्यायालयात दिवाणी दावा क्र. २४/२०२३ हा दावा घराच्या

वाटणीसाठी दाखल केला असल्याचे कबुल केले आहे. ईतर बाबी त्याने नाकारल्या आहेत.

**११.** फिर्यादीची पत्नी छाया काळे (सा.क्र.०३) हिचे असे कथन आहे की, घटना एक वर्षापुर्वी दुपारी ०२.०० ते ०२.३० वाजेच्या सुमारास तिच्या घरासमोर घडली होती. आरोपी क्र. ०१ राजेश काळे हा सामाईक भिंतीला छिद्र पाडत होता. तिचा पती आरोपी क्र. ०१ यास भिंतीला छिद्र पाडु नको, असे सांगत असतांना सर्व आरोपींनी तिच्या पतीला मारहाण केली. आरोपी क्र. ०१ व ०३ यांनी तिच्या पतीला डाव्या डोळ्याजवळ कोयत्याने मारले. ती सोडवण्यास गेली असता तिला ही आरोपींनी धक्का बुक्की केली. त्यानंतर तिच्या पतीने फिर्याद दिली. पोलिसांनी तिचा जबाब नोंदवला होता. तिने आर्टीकल – अ कडील जप्त कोयता ओळखला. तिच्या उलटतपासात तिने आरोपींसोबतचे नातेसंबंध मान्य केले आहे. तसेच घटनेच्या दिवशी आरोपी क्र. ०१ हा दरवाजा बसवत असल्याचे देखील मान्य केले आहे. ती घटनेच्या ठिकाणी गेली तेव्हा तेथे गावातील लोकं जमा झाले होते, असे तिने कथन केले आहे. ईतर बाबी तिने नाकारल्या आहेत.

**१२.** वैद्यकीय अधिकारी मोहम्मद अली (सा.क्र.०४) यांच्या पुराव्यात असे आले आहे की, दिनांक १६.०५.२०२२ रोजी ते सोनखेड प्राथमीक आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकारी म्हणुन कार्यरत होते. त्यादिवशी दुपारी ०४.५५ वाजता फिर्यादी संजय काळे हा त्यांच्या दवाखान्यात उपचारासाठी आला होता. फिर्यादीने त्याला मारहाण झाल्याचे सांगितले होते. त्याने फिर्यादीस तपासले असता फिर्यादीच्या उजव्या डोळ्याच्या वरील भागास खरचटल्याची दुखापत झाल्याचे आढळुन आले. सदर दुखापत २ X ०.५ X ०.५ से.मी. आकाराची, साध्या स्वरुपाची व २४ तासाच्या आतील होती. सदर दुखापत ही तीक्ष्ण हत्याराने होऊ शकते असे कथन केले. त्या प्रमाणे त्यांनी फिर्यादीवर उपचार करुन फिर्यादीचे वैद्यकीय प्रमाणपत्र (नि.क्र.४१)

दिले. त्यांनी वैद्यकीय प्रमाणपत्रावरील त्यांची ओळखुन त्यातील मजकुर बरोबर असल्याचे सांगितले. त्यांची त्यांच्या उलटतपासात फिर्यादीच्या अगोदर आरोपी क्र. ०३ विठ्ठल काळे हा त्यांच्या दवाखान्यात जखमी अवस्थेत उपचारासाठी आला होता, असे कबुल केले आहे. तसेच त्यांनी आरोपी क्र. ०३ ला उपचारासाठी नांदेड येथे पाठविल्याचे देखील कबुल केले आहे. फिर्यादी संजय काळे हा स्वत: पोलिसांचे पत्राशिवाय दवाखान्यात आल्याचे कबुल केले आहे. वैद्यकीय प्रमाणपत्र नि.क्र. ४१ वरील दुखापती व्यतिरिक्त ईतर कोणतीही दुखापत फिर्यादीस झालेली नसल्याचे कबुल केले आहे. फिर्यादीस झालेली दुखापत ही फावड्याने होऊ शकते असे कबुल केले आहे.

**१३.** तपास अधिकारी श्री डब्ल्यु. एम. नागरगोजे (सा.क्र.५) यांच्या पुराव्यात असे आले की, दिनांक १६/०५/२०२२ रोजी ते सोनखेड पोलीस ठाण्यात कार्यरत असतांना प्रस्तुत गुन्हयाचा तपास त्यांच्याकडे देण्यात आला होत. त्यानंतर दिनांक २३/०५/२०२२ रोजी त्यांनी घटनास्थळावर जावुन दोन पंचांसमक्ष घटनास्थळ पंचनामा नि.क्र. ५३ तयार केला. त्यांना पंचांची नावे सांगता येणार नाही असे सांगितले. त्यानंतर दिनांक २७/०५/२०२२ रोजी आरोपी क्रमांक ०१ ने गुन्हयात वापरलेला कोयता पोलीस ठाण्यात हजर केल्याने त्यांनी पंचांसमक्ष सदर कोयता जप्त करून जप्ती पंचनामा नि.क्र.५४ तयार केला. त्यानंतर साक्षीदारांचे जबाब नोंदविले. फिर्यादीची वैद्यकिय प्रमाणपत्र प्राप्त केले. तपास पुर्ण करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. त्यांनी त्यांच्या उलटतपासात फिर्यादी व आरोपी यांची घरे समोरा समोर असल्याचे व त्यांच्या घराच्या आजु बाजुला राहणा–या लोकांचे जबाब नोंदविले नसल्याचे कबुल केले आहे. तसेच आरोपींनी देखील फिर्यादीविरूध्द गुन्हा दाखल केले असल्याचे व त्या गुन्हयाचा तपास देखील त्यांनीच केले असल्याचे कबुल केले आहे.

१४. वरीलप्रमाणे अभियोग पक्षातर्फे पुरावा सादर करण्यात आलेला आहे. सदर पुरावा हा आरोपींविरूध्द गुन्हा सिध्द होण्यासाठी पुरेसा आहे किंवा नाही हे पाहणे आवश्यक आहे. अभियोग पक्षाच्या कथनाप्रमाणे आरोपी क्र. १ ने फिर्यादीच्या उजव्या डोळ्याजवळ कोयत्याने मारुन दुखापत केली. तसेच सर्व आरोपींनी फिर्यादी व त्याच्या पत्नीला लाथा बुक्क्यांनी मारुन दुखापत केली. फिर्यादीचे असे कथन आहे की, त्याला आरोपी क्रमांक ०१ ने कोयत्याने डोळयाजवळ मारून दुखापत केली. तसेच सर्व आरोपींनी त्याला लाथाबुक्यांनी मारहाण केली. फिर्यादीची पत्नी हिचे असे कथन आहे की,आरोपी क्रमांक ०१ व ०३ या दोघांनी फिर्यादीस कोयत्याने मारून दुखापत केली. वरील दोन्ही साक्षीदारांच्या पुराव्यातुन निश्चीत कोणत्या आरोपीने फिर्यादीस कोयत्याने मारून दुखापत केली हे स्पष्ट होत नाही. सदर महत्वाच्या घटने बाबत वरील दोन्ही साक्षीदारांच्या पुराव्यामध्ये विसंगती आहे.

१५. अभियाग पक्षातर्फे फिर्यादी व त्याच्या पत्नी व्यतिरीक्त ईतर कोणतेही साक्षीदार तपासण्यात आलेले नाहीत. फिर्यादीने त्याच्या उलटतपासात घटनेची वेळी कोणी लोक जमले होते किंवा नाही हे त्याला आठवत नसल्याचे सांगितले आहे. परंतू फिर्यादीच्या पत्नीने उलटतपासात घटनेच्या वेळी गावातील लोक जमा झाले होते असे सांगितले आहे. फिर्यादीच्या उलटतपासात त्यांच्या घराच्या आजु बाजुला बाबु डेमेवाड व दिगांबर काळे यांची घरे असल्याचे कबुल केले आहे. यावरून घटनेच्यावेळी ईतरही प्रत्यक्षदर्शी साक्षीदार हजर होते असे दिसुन येते. परंतु अभियोग पक्षातर्फे ईतर कोणतेही साक्षीदार तपासण्यात आलेले नाही. फिर्यादी व त्याचा पत्नीचा पुरावा हा एकमेकाशी पुरक व सुसंगत असा नाही. त्याच्या उलटतपासातुन असे दिसुन येते की, आरोपी व त्यांच्या मध्ये शेती व घराच्या वाटणीवरून वाद आहेत. तसेच आरोपीने देखील त्यांच्याविरूध्द गुन्हा दाखल केलेला आहे. त्यामुळे फिर्यादी व आरोपी यांच्यात घटनेच्या पुर्वीपासुन पुर्ववैमनस्य असल्याचे दिसुन येते.

**१६.** प्रस्तुत प्रकरणात घटनाही १६/०५/२०२२ रोजी घडली असुन फिर्याद दिनांक २२/०५/२०२२ रोजी म्हणजेच ०६ दिवसाच्या विलंबाने दाखल केलेली आहे. सदर विलंबाच्या अनुषंगाने फिर्यादीचे असे कथन आहे की, दवाखान्यात उपचार घेवुन आल्यानंतर त्याची मानसिक स्थिती बरोबर नसल्यामुळे त्याने फिर्याद दिनांक २२/०५/२०२२ रोजी दिली होती. वैद्यकिय अधिकारी यांच्या पुराव्यातुन फिर्यादीस साध्या स्वरूपाची दुखापत झाली असल्याचे व त्याच दिवशी फिर्यादीवर उपचार करून त्यास सुट्टी दिल्याचे दिसुन येते. यावरून घटनेच्या दिवसापासुन फिर्यादी हा घरीच असल्याचे स्पष्ट होते. अशापरीस्थीतीत उपचार घेवुन आल्यानंतर लगेच फिर्याद देणे फिर्यादीस शक्य होते. तरी देखील ०६ सहा दिवसाच्या विलंबाने फिर्यादीने फिर्याद दिली असुन त्याने कथन केल्याप्रमाणे त्याची मानसिक स्थीती बरोबर नसल्याबाबत फिर्याद नि.क्र.३६ मध्ये काहीही नमुद केलेले नाही. त्यामुळे फिर्यादीने विलंबाबाबत दिलेले कारण हे संयुक्तीक दिसुन येत नाही. आरोपी व फिर्यादी यांच्या पुर्वी पासुन वाद असल्याचे व आरोपींनी देखील फिर्यादीविरूध्द गुन्हा दाखल केला असल्याचे दिसुन येते. तसेच फिर्यादी व त्याच्या पत्नी पुरावा हा एकमेकांशी पुरक व सुसंगत असा नाही. अशा परीस्थीतीत पुर्व वैमनस्यातुन आरोपींना प्रस्तुत गुन्हयात गोवल्याची शक्यता नाकारता येत नाही.

**१७.** घटनास्थळ पंच दिपक जाधव (सा.क्र.०१) याने अभियोग पक्षास सहकार्य केलेले नाही. तपास अधिकारी यांच्या कथनाप्रमाणे त्यांनी पंचांसमक्ष घटनास्थळ पंचनामा तयार केला होता. परंतू त्यांना पंचांची नावे सांगता आलेली नाही. तसेच घटनास्थळ पंचनामा निश्चीत कोणत्या ठिकाणी तयार केला हे देखील त्यांच्या पुराव्यातुन स्पष्ट होत नाही. त्यामुळे घटनास्थळ पंचनामा देखील सिध्द झालेला नाही. तपास अधिकारी यांच्या कथनाप्रमाणे त्यांनी आरोपी क्रमांक ०१ कडून पंचांच्या समक्ष कोयता जप्त करून जप्ती पंचनामा तयार केला. परंतु तपास अधिकारी यांच्या पुराव्यास दुजोरा देण्यासाठी अभियोग पक्षातर्फे कोणत्याही जप्ती

पंचांस तपासण्यात आलेले नाही. त्यामुळे आरोपी क्रमांक ०१ कडून गुन्हयात वापरलेला कोयता जप्त केला ही बाब देखील संशयाच्या पलिकडे जावुन सिध्द होत नाही.

**१८.** एकंदरीत अभिलेखावरील पुराव्यातुन आरोपींनी फिर्यादीस कोयता या घातक हत्याराने व लाथा बुक्यांनी मारहाण करुन ईच्छापुर्वक दुखापत केली तसेच शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली याबाबी संशयाच्या पलीकडे जावुन सिध्द होत नाहीत. त्यामुळे सबळ पुराव्या अभावी संशयाच्या आधारे आरोपी हे निर्दोष मुक्ततेस पात्र आहेत. सबब वरील सर्व वादप्रश्नांची उत्तरे नकारार्थी देण्यात येत आहे.

## <u>वादप्रश्न क्र. ५ करिता</u>

**१९.** वरील सर्व वादप्रश्नांचे उत्तर हे नकारर्थी आल्यामुळे आरोपींची वरील सर्व आरोपातुन निर्दोष मुक्तता करण्याच्या निष्कर्षावर सदर न्यायालय आले आहे. त्यामुळे वरील सर्व विश्लेषण पाहता वादप्रश्न क्र.५ च्या उत्तरादाखल खालील आदेश पारित केला आहे.

## <u>आ दे श</u>

| | | |
|---|---|---|
| ०१. | आरोपी क्र. १. **राजेश व्यंकटराव काळे,** आरोपी क्र. २ **उज्वला राजेश काळे,** आरोपी क्र. ३ **विठ्ठल व्यंकटराव काळे** व आरोपी क्र. ४ **सुरेखा विठ्ठल काळे** यांची भारतीय दंड संहिता, १८६० कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये शिक्षापात्र अपराधातुन फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २४८ (१) नुसार **निर्दोष मुक्तता** करण्यात येते. | |
| ०२. | आरोपींचे बंधपत्र व जामीन कदबा दोषमुक्त करण्यात येते. | |
| ०३. | जप्त मुद्देमाल एक कोयता (आर्टीकल–अ) मुल्यहीन असल्याने अपील कालावधीनंतर नष्ट करण्यात यावी. | |

| | | |
|---|---|---|
| ०४. | आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ कलम ४३७–अ अन्वये जामीनाची पुर्तता करावी. | |
| ०५. | फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ कलम ३५३(१)(क) नुसार निकाल खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला. | |

SANTOSH LAXMAN VAIDYA
Digitally signed by SANTOSH LAXMAN VAIDYA
Date: 2025.05.15 10:50:54 +0530

लोहा
दिनांक: ०८/०५/२०२५

(संतोष एल. वैद्य)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग
लोहा, जिल्हा नांदेड

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file judgment/order are same word to word, as per the original judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer (L. G.) | : | Vaibhavsing N. Thakur |
| Court Name | : | Civil Judge Jr. Div. & J.M.F.C. Loha,<br>Tq. Loha, Dist. Nanded. |
| Date | : | 08/05/2025 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer on | : | 08/05/2025 |
| Judgment/order uploaded on | : | 09/05/2025 |

(V. N. Thakur)
Stenographer (Grade-III)